**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २०/२०१७-१८/२८१ दिनांक: २७.०९.२०१७

## आदेश

**आदेश केस क्र. २०/२०१७-२०१८**

| | |
|---|---|
| श्री विश्वास यल्लाप्पा कोळी<br>मु.पो. कासलिंगवाडी ता. जत<br>जि. सांगली | **तक्रार**<br><br>**अर्जदार**<br>**(ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, सांगली<br><br>३) कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय कवठेमहाकाळ<br><br>४) उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपाविभाग जत | **विरुध्द पक्षकार** |

**कोरमः-** १.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
२. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

मी प्रदिप वि. खपली , सदस्य सचिव, ग्राहक तक्रार,निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे - न्याय निर्णय देत आहे.

## तक्रारीचे स्वरुप व ग्राहकाची मागणी

श्री विश्वास यल्लाप्पा कोळी, मु.पो. कासलिंगवाडी ता. जत जि. सांगली हे घरगुती विज ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्र. २७१०५०२६५२३८ आहे. त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे दि. १०.०३.२०१७ रोजी ना दुरुस्त मिटर आणि अनुषंगाने चुकीची देयके या विषयी "क्ष"मध्ये तक्रार केली. त्या संदर्भातील दि. ०८.०५.२०१७ राजी सांगली कक्षाने दिलेल्या आदेशामुळे समाधान न झाल्यामुळे सदर तक्रार दि. ३०.०५.२०१७ रोजी या मंचाकडे दाखल केली.

या प्रकरणाची सुनावणी दि. २२.०९.२०१७ रोजी मंचासमोर घेण्यात आली. सुनावणी दरम्यान तक्रारदारातर्फे श्री हरिभाऊ खापरे हे ग्राहक प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. वितरण परवाना धारकांतर्फे श्री एस.डी. काळबांधे, उपकार्यकारी अभियंता उपविभाग जत हे उपस्थित होते.

तक्रारदारातर्फे खालील प्रमाणे मागणी करण्यात आली आहे.

१) डिसेंबर २०१४ चे आधी पासून मिटर ना दुरुस्त असून हे मिटर न बदलता चुकीची देयके देण्यात आल्यामुळे विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठयाच्या इतर अटी विनियम २००५ अंतर्गत अधिनियम १५.४ नुसार विज देयक दुरुस्त करुन देण्यात यावे.
२) अधिनियम १४.४.४ अंतर्गत तपासणी करण्यात आलेले मिटर संपूर्ण ना दुरुस्त असलेने वि.प. ने तपासणी आकार परत करावा.
३) अधिनियम १५.४ नुसार तपासणीच्या निष्कर्षा आधारे डिसेंबर २०१४ च्या मागील ३ महिन्यांच्या कालवधीतील देयकाची रक्कम समायोजित करण्यात यावी.
४) कृती मानके विनियमातील परिशिष्ट 'अ' मधील (४) मिटर्स मधील तरतुदीनुसासर मिटर तपासणी अहवाल न दिल्यामुळे प्रति आठवडयास रु. ५०/- प्रमाणे भरपाई देण्यात यावी.
५) ग्राहकाला झालेल्या त्रासापोटी नुकसान भरपाई रु. १०,०००/- देण्यात यावी.

## वितरण कंपनीची भूमिका

१) सदर ग्राहकाचे जुने मिटर तबकडीचे असलेमुळे व जुने असल्यामुळे होणा-या झिजेमुळे गजलेले झाल्यामुळे अशा प्रकारचे मिटर असलेल्या सर्व ग्राहकाचे मिटर बदली मोहिमे अंतर्गत दि. ११.०४.२०१५ रोजी बदलण्यात आले. त्या करिता ग्राहकाकडून कुठल्याही प्रकारे फी भरुन घेण्यात आली नाही.

२) हे मिटर बसविल्यानंतर सुफवातीला Inacess व Lock असल्याचे दाखवून कमी युनिटचे बिल ग्राहकाला दिल्या गेले वऑक्टोबर २०१७ मध्ये रिडींग प्रमाणे ग्राहकाला बिल देण्यात आले. ग्राहकाकडून ऑगस्ट २०१५ पासून एकही देयक भरले गेले नाही.

३) हया मिटरची तोंडी तक्रार असल्यामुळे (ग्राहकाने तपासणी फी रु. १५०/- हे पावती क्रमांक ५०११३८४ दिनांक १६.०६.२०१६ रोजी भरले आहेत. हे मिटर दि. ०७.०३.२०१६ रोजी बदलण्यात आले.

४) आगस्ट २०१५ पासून थकबाकी असल्यामुळे ग्राहकाचा विज पुरवठा दि. १०.०३.२०१६ रोजी कायमचा बंद करणेत आला. त्या दरम्यान विज पुरवठा पुन्हा सुरु करणेचा असलेमुळे ग्राहकाने हया मिटरची तपासणी फी रु. १५०/- ग्राहकाने पा.क्र. ४३७८३१९ दि. ३१.११.२०१६ रोजी भरलेले आहेत.

५) वरील दोन्ही मिटरचे तपासणी अहवाल अनुक्रमे माहे डिसेंबर १६ व माहे फेब्रुवारी २०१७ रोजी प्राप्त झाल्यानंतर तसेच अंतर्गत कक्ष सांगली यांचे आदेशानुसार विज देयक रु. २,८८५.१२ असे ग्राहकाला दुरुस्त करुन देण्यात आले ते भरल्यानंतर त्यांचा विज पुरवठा पुर्ववत करण्यात येईल. वरील प्रकरणात मंचासमोर खालील प्रश्न उपस्थित होतात.

१) ग्राहकाला विद्युत विनियम अंतर्गत अधिनियम १५.४.१ नुसार देयक मिळणे योग्य होईल काय?
उत्तरः- होय
२) ग्राहकाने भरलेली तपासणी फी रु. १५०/- + रु. १५०/- = रु. ३००/- परत मिळण्यास ग्राहक पात्र आहे काय?
उत्तरः- होय.
३) मिटर तपासणी अहवाल ग्राहकाला न मिळाल्यामुळे विद्युत अधिनियम मधील परिशिष्ट 'अ' अंतर्गत (४) मिटर्स मधील तरतुदीनुसार नुकसान भरपाई मिळणेस ग्राहक पात्र आहे काय?
उत्तरः- होय

## कारणमिमांसा

६) तक्रारदार यांचे मिटर डिसेंबर २०१४ पूर्वी पासून ना दुरुस्त असल्याचे कागदपत्राची पडताळणी नुसार स्पष्ट होते. त्यानंतर देखिल बदलविण्यात आले ते मिटर्स ना दुरुस्त असल्याचे अहवालानुसार स्पष्ट होते. म.रा.वि.नियामक आयोगविनियम २००५ अंतर्गत अधिनियम नुसार १५.४.१अधिनियमाच्या भाग १२ आणि भाग १४ मधील तरतुदीना अधीन राहून मीटर सदोषअसेल तर तपासणी अहवालाच्या निष्कर्षानुसार तयार करण्यात आलेले देयक व त्यासोबत तपासणी अहवाल पाठविण्यांत आला असेल तर मीटर सदोष असल्याचे ज्या महिन्यात निदर्शनास आले असेल त्या महिन्याच्या मागील जास्तीजास्त ३ महिन्याच्या कालावधीतील ग्राहकाच्या देयकाची रक्कम समायोजित करण्यात येईल.
या तरतुदीनुसार ग्राहकाचे देयक सप्टेंबर २०१४ ते नोव्हेंबर २०१४ या तीन महिन्यात सरासरी प्रमाणे बिल काढून पुढील फक्त ३ महिन्याचे देयक ग्राहकाकडून वसूल करावे. आणि ग्राहकाने डिसेंबर २०१४ ते सप्टेंबर २०१७ या काळातील बिलापोटी भरलेली रक्कम त्यातून समायोजित करावी .

७) ग्राहकाने तपासणी फी अंतर्गत एकूण रु. ३००/- असे भरलेले आहेत. केवळ सांगली कक्षाचे आदेशात नमूद केल्यामुळे तपासणी फी ७.०३.२०१६. रोजी भरल्याचे सिध्द होत नाही आणि त्याबाबत ठोस पुरावा मंचाकडे दाखल केलेला नसल्यामुळे ग्राहकाला एकूण रु. ३००/- तपासणी फी म.रा.वि.नि.आयोग विनियम २००५ अंतर्गत अधिनियम १४.४.४ नुसार परत करणे योग्य होईल असे या मंचास वाटते.

८) परिशिष्ट 'अ' मधील तरतुदीनुसार मिटर्स तपासणी अहवाल ग्राहकाला वेळेत पोहाचे न केल्याबद्दल फेब्रुवारी २०१७ ते ऑगस्ट २०१७ पर्यन्त प्रत्येक आठवडयास रु. ५०/- प्रमाणे होणारी दंडाची रक्कम ग्राहकाला देण्यात यावी व सदर रक्कम मुळ कसूरदाराकडून वसूल करण्यात यावी.

**आदेश**

१) मीटर १०० टक्के ना दुरुस्त असल्यामुळे नियमाप्रमाणे फक्त तीन महिन्याची बिले आकारणी करावी.

२) तपासणी फी रु. ३००/- परत करावी.

३) मीटर तपासणी अहवाल वेळेत न दिल्यामुळे नियमाप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात यावी व ही रक्कम कसुरदाराकडून वसूल करण्यात यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

दिनांक ०१.०७.२०१७ पासून अध्यक्ष पद रिक्त आहे.

२८/८/२०१७

(श्री प्र. स. बुरांडे)
ग्राहक सदस्य

(प्र.वि. खपली)
सदस्य सचिव